कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २० /९४.

क्र. राप/कर्मवर्ग/६०१-वै/ ४७६७
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई - ४०० ००८. दिनांक : २८. ९. १९९४.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा. प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

व्यवस्थापक [प्रशिक्षण],
रा. प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

मुख्य सल्लागार,
संस्थांतर्गत व्यवस्थापन सल्लागट, रा. प. भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक,
रा. प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई/मुंबई/धुळे/जळगांव/नाशिक/पालघर/रायगड [पेण]/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/पुणे/अहमदनगर/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/अकोला/अमरावती/भंडारा/बुलढाणा/चंद्रपूर/वर्धा/यवतमाळ/

कार्यकारी अभियंता,
रा. प. औरंगाबाद/धुळे/कोल्हापूर/नागपूर/पुणे/परभणी/कुर्ला/अकोला/बारामती.

विषय : वैद्यकीय देयकाची प्रतिपूर्ती ---
मार्गदर्शक सूचना.

...

महामंडळाच्या कर्मचा-यांना ज्या विविध वैद्यकीय सवलती उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत त्याविषयी माहिती देणारे पुस्तक यापूर्वीच सर्व कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यामुळे वैद्यकीय सवलतीबाबत कार्यालयीन पातळीवर किंवा मानसेवी वैद्यकीय अधिका-यांच्या पातळीवर कार्यवाही करतांना अडचणी येऊ नयेत किंवा त्या अगदी कमीत कमी असाव्यात अशी अपेक्षा आहे. तसेच वैद्यकीय देयकांच्या संबंधात सर्व रा. प. कार्यालयांमध्ये एकरुपपणे कार्यवाही होणे अपेक्षित आहे. तथापि या कार्यालयाशी वेगवेगळया विभागीय कार्यालयाकडून होणा-या पत्रव्यवहारावरुन असे दिसते की, काही तरतुदींबाबत संबंधितांचे गैरसमज आहेत, म्हणून आतापर्यंत लक्षात आलेल्या अशा मुद्यांबाबत आपल्या मार्गदर्शनार्थ खालील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे, त्याची संबंधित कर्मचारी/अधिकारी यांनी दखल घ्यावी. तसेच आवश्यक त्याबाबत मानसेवी वैद्यकीय अधिका-यांना सुध्दा त्याबाबत माहिती द्यावी, जेणेकरुन या कारणामुळे कामगार तक्रारी उद्भवणार नाहीत.

१] महामंडळाच्या कर्मचा-यांना आयुर्वेदिक औषधोपचारांची [तज्ञाच्या सल्ल्यासहित] प्रतिपूर्ती करण्याची तरतूद आहे. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, आयुर्वेदामधील एम. डी. किंवा त्याच्याशी समान पदवी धारण करणा-या